0001

# नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक २२/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६२/२०१२/जा.५९९, दिनांक २७/०८/२०१२.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजी प्राप्त अभिवेदन.

४) गाळ्याचा मालक मुकेश हिरालाल मिर्ध यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजीचे निवेदन.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६२/२०१२/जा. ७८५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०८ / ११ /२०१२.

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २८/०३/२०१२ रोजी मा. पोलिस उपआयुक्त (अंमलबजावणी) तसेच गुन्हे शाखा नियंत्रण यांचे पथकास मिळालेल्या बातमीनुसार गुन्हे शाखा नियंत्रण येथील सहा. पोलिस आयुक्त श्री. फिरोज पटेल यांचेसह पोलिस शिपाई श्री. प्रविण शांताराम पाटील पठाणवाडी, किस्मतनगर, कुर्ला (प), मुंबई - ७० या ठिकाणी आले. त्यावेळी सदर ठिकाणी कुर्ला पोलिस ठाणेचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक श्री. भालेराव, पो. निरिक्षक आर.डी. जाधव, स.पो.नि. पटेल, फासे, पो. उपनिरिक्षक पावले, सावंत यांना सदर ठिकाणी बोलावून त्यांचेसह महालक्ष्मी लुब्रीकेंट ऑईल, डी-७, मक्सुद इस्टेट, पठाणवाडी, किस्मतनगर, कुर्ला (प), मुंबई - ७० या गाळ्यामध्ये गैरव्यवहाराने ऑईल व इतर रसायने यामध्ये मिश्रण करुन बनावट ग्रीस तयार करुन विक्रीसाठी ठेवले असल्याचे विश्वसनीय बातमी मिळाली असून सदर ठिकाणी छापा मारुन कारवाई करावयाची आहे, अशी माहिती सोबत असलेल्या सर्व अधिकारी व अंमलदार यांना दिली.

0002

सदर कारवाई कामी दोन पंचांना स.पो.आ. फिरोज पटेल यांनी पाचारण करुन त्यांनाही वर नमूद मिळालेल्या बातमीचा आशय समजावून सांगून वरील पथक जवळच असलेले महालक्ष्मी लुब्रीकेंट ऑईल, डी-७ येथे पोहचले. सदर गाळ्याचा दरवाजा उघडा असल्याने वरील पथक पंचांसह आतमध्ये गेले असता एकूण ३ इसम गाळ्यामध्ये दिसून आले. त्यापैकी एक इसम खुर्चीमध्ये बसलेला होता. त्यास स.पो.आ. फिरोज पटेल यांनी त्यांचे ओळखपत्र दाखवून सदर ठिकाणी येण्याचा उद्देश सांगितला व त्यांनी सोबतच्या पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांची ओळख करुन देऊन त्यांना मिळालेले माहितीबाबत कळवून त्यास गाळ्याची तपासणी करावयाची आहे, असे सांगितले. त्याच्या अनुमताने सदर गाळ्याची तपासणी करता, गाळ्याचे उत्तरेकडील भिंतीलगत पेटत्या शेगडीवर एक लोखंडी मोठी कडई ठेवलेली दिसून आली व त्या कडईमध्ये ऑईल व पावडरचे मिश्रण करुन ग्रीस तयार करत असल्याचे दिसून आले. त्याच्या शेजारी दोन इसम सदरचे काम करीत असल्याचे आढळून आले. त्यांना त्यांची कृती थांबविण्यास सांगून त्यांची नांवे विचारली असता, खुर्चीवर बसलेल्या इसमाने तो त्या गाळ्याचा मालक असल्याचे सांगून त्याने त्याचे नांव मुकेश हिरालाल मिर्घ असे सांगितले. तसेच कडईजवळ उभ्या असलेल्या इसमांना त्यांचे नांव विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे लालजी हिरालाल जयस्वाल व विनोद राम बच्चन यादव अशी असल्याची सांगितली.

वर नमूद इसमांना ते तयार करीत असलेले पदार्थाबाबत विचारणा केली असता, त्यांनी ऑईल व केमिकल पावडर यांचे मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करीत असल्याचे कबूल केल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर गाळ्याचे वर नमूद मालकास सदर ग्रीस तयार करण्याच्या प्रक्रियेबाबतचा परवाना व इतर कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे व परवाना नसल्याचे सांगितले.

अशाप्रकारे वरील नमूद इसमांनी आपापसात संगणमत करुन गैरमार्गाने मिळविलेल्या ऑईल व पावडर (रासायनिक) यांच्या मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करुन तसेच बेकायदेशिर ऑईलचा साठा केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७ (२), ८, २) ) दि ल्युब्रिकेटींग ऑईल ॲण्ड ग्रिसेस प्रोसेसिंग सप्लाय ॲण्ड डिस्ट्रीब्युशन ऑर्डर - १९८७ चे कलम ३ व ४, ३) दि महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लोप (ॲक्विझीशन, सेल, स्टोरेज ॲन्ड प्रिव्हेन्शन ऑफ युज इन ऑटोमोबाईल) (अनुज्ञापन) ऑर्डर २००७ चे कलम ३, ४, तसेच ४) भा. द. वि. चे कलम ४२० व ३४ चा भंग केल्यावरुन कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६५/२०१२, दिनांक २८/०३/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लिटर क्षमतेचे १४ लोखंडी बॅरेल त्यामध्ये पिवळसर रंगाचे ऑईलने भरलेले ल्युब ऑईल | २८०० लिटर | २,२४,०००/- |
| २ | २०० लिटर क्षमतेचे ९ लोखंडी ड्रम काळ्या रंगाचे ऑईलने भरलेले | १८०० लिटर | ९०,०००/- |
| ३ | २०० लिटर क्षमतेचे ४ लोखंडी बॅरेल काळ्या रंगाचे ऑईलने अर्धे भरलेले | २०० लिटर | १०,०००/- |
| ४ | २०० किलो क्षमतेचे ४ लोखंडी बॅरेल त्यामध्ये काळ्या रंगाचे ग्रीस | ८०० किलो | ८०,०००/- |
| ५ | २०० किलो क्षमतेचे २ लोखंडी बॅरेल सफेद रंगाच्या ग्रीसने भरलेले | ४०० किलो | ४०,०००/- |
| ६ | सफेद रंगाची सोप स्टोन पावडरने भरलेले ३७ गोण्या त्यावर जे. अरावली मिनरल इंडस्ट्रीज कंपनीचा मार्क असलेले असे ५० किलो | - | ७,४००/- |
| ७ | एक जुनी वापरती काळ्या रंगाची कडई, शेगडी व इतर साहित्य | - | १०,०००/- |
| | | एकूण | ४,६१,४००/- |

सदर गोडावूनमधील माल हा वाहतुकीस अवजड व ज्वलनशिल असल्याने जागीच ठेवून सदर गाळ्याचा मुख्य दरवाजा बंद करुन त्यास कुलूप लावून त्यावर पोलिसांचे व पंचांचे सह्यांचे लेबल लावण्यात आले.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ११/०९/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. प्रविण विश्वनाथ पावले हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस गाळ्याचा मालक मुकेश हिरालाल मिर्घ यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ४ अन्वये लेखी निवेदन सादर केले. सदर सुनावणीस लालजी हिरालाल जयस्वाल व विनोद राम बच्चन यादव हे उपस्थित राहिले. तथापी, ते गाळ्याचे मालक यांचेकडे नोकरी करीत असल्याचे तसेच त्यांना याप्रकरणी काहीही सांगावयाचे नसल्याचे सांगून लेखी निवेदन सादर केले नाही.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ११/०९/२०१२ रोजी प्राप्त अभिवेदनासोबत तपासी पोलिस अधिकारी यांनी रासायनिक पृथ:करण अहवालाची छायांकित प्रत सादर केली असून सदर अहवालामध्ये, 1) Exhibit Nos. 1 contains vegetable oil. 2) Exhibit Nos. 2 & 3 contain petroleum hydrocarbon oil having density at 30 °C is 0.881 and 0.873 and flash point 160 °C and 130 °C respectively. 3) Exhibit No. 4 & 5 contain grease. 4) Aluminum, Calcium, Magnesium, Carbonate and Silicate radicals are detected in Exhibit No. 6 असे नमूद आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयासाठी राखून ठेवण्यात आले.

युक्तिवाद :-

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरिक्षक श्री. प्रविण विश्वनाथ पावले यांनी युक्तीवाद केला की, दिनांक २८/०३/२०१२ रोजी पोलिस उप आयुक्त (अंमलबजावणी) व गुन्हे शाखा नियंत्रण यांच्या पथकास मिळालेल्या बातमीनुसार पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला असता घटनास्थळी बनावट ग्रीस बनवत असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच सदर ठिकाणी वेगवेगळया ऑईलचे ड्रम व इतर पावडर मिळुन आल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयामध्ये जप्त केलेल्या मुद्देमालाचे नमुने संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडे रासायनिक विश्लेषनाकरीता पाठविण्यात येवून सदर अहवाल वेळेत प्राप्त न झाल्याने स्मरणपत्रे पाठविण्यात आली. सदर अहवाल उशिराने प्राप्त झाल्याने पोलिस ठाण्याकडून सदरचे प्रकरण जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीसाठी उशिराने सादर करण्यात आल्याचे नमुद करुन जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीबाबत आदेश होणेस विनंती केली.

दिनांक ११/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित गाळ्याचा मालक मुकेश हिरालाल मि[illegible]यांनी युक्तीवाद केला की, प्रस्तुत प्रकरणी त्यांना विविध आस्थापनांकडून निर्गमित करण्यात आलेला परवाना, [illegible] परवाना व नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती निवेदनासोबत सादर केल्या आहेत. पोलिसांनी गोदाम सिल [illegible] त्याच्यावर अन्याय केला आहे. सदरचे गोदाम सिलमुक्त करण्याकरीता त्याने महानगर दंडाधिकारी, ११ वे न्यायालय, कुर्ला यांच्या न्यायालयात अर्ज केला आहे व त्या अनुषंगाने पोलिसांनी त्याबाबत मा. न्यायालय येथे सादर केलेल्या लेखी म्हणणेची छायांकित प्रतही सोबत जोडली आहे. पोलिसांनी घटनास्थळी घेण्यात आलेले नमुने रासायनिक पृथ:करणासाठी संचालक, न्याय सहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचेकडे पाठविले असुन सदर अहवाल प्राप्त झाल्यास ते निर्दोष असल्याबाबत सिध्द होईल असे नमुद करुन त्यांचे गोदाम बरेच दिवस सिलबंद असल्याने योग्य ते आदेश पारीत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

0005

<u>निष्कर्ष :-</u>

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

दिनांक २८/०३/२०१२ रोजी मा. पोलिस उपआयुक्त (अंमलबजावणी) तसेच गुन्हे शाखा नियंत्रण यांचे पथकास मिळालेल्या बातमीनुसार महालक्ष्मी लुब्रीकेंट ऑईल, डी-७, मक्सुद इस्टेट, पठाणवाडी, किस्मतनगर, कुर्ला (प), मुंबई - ७० या गाळ्यामध्ये गैरव्यवहाराने ऑईल व इतर रसायने यामध्ये मिश्रण करुन बनावट ग्रीस तयार करुन विक्रीसाठी ठेवले असल्याचे विश्वसनीय बातमी मिळाल्यानुसार पोलिस पथकाने पंचांसह छापा टाकला असता एकूण ३ इसम गाळ्यामध्ये दिसून आले. सदर गाळ्याची तपासणी करता, गाळ्याचे उत्तरेकडील भिंतीलगत पेटत्या शेगडीवर एक लोखंडी मोठी कडई ठेवलेली दिसून आली व त्या कडईमध्ये ऑईल व पावडरचे मिश्रण करुन ग्रीस तयार करत असल्याचे दिसून आले. त्याच्या शेजारी दोन इसम सदरचे काम करीत असल्याचे आढळून आले. पोलिस पथकाने त्यांची कृती थांबविण्यास सांगून त्यांची नांवे विचारली असता, मुकेश हिरालाल मिर्घ याने तो त्या गाळ्याचा मालक असल्याचे सांगून इतर लालजी हिरालाल जयस्वाल व विनोद राम बच्चन यादव अशी सांगितली. सदर इसमांना ते तयार करीत असलेले पदार्थाबाबत विचारणा केली असता, त्यांनी ऑईल व केमिकल पावडर यांचे मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करीत असल्याचे कबूल केल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. तसेच सदर गाळ्याचे वर नमूद मालकास सदर ग्रीस तयार करण्याच्या प्रक्रियेबाबतचा परवाना व इतर कागदपत्रांबाबत विचारणा केली असता, त्यांनी त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे व परवाना नसल्याचे सांगितल्याने नमूद इसमांनी आपापसात संगणमत करुन गैरमार्गाने मिळविलेल्या ऑईल व पावडर (रासायनिक) यांच्या मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करुन तसेच बेकायदेशिर ऑईलचा साठा केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द गुन्हा नोंद करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तपासी पोलिस अधिकारी यांनी केलेल्या युक्तीवादात पोलिस उप आयुक्त (अंमलबजावणी) व गुन्हे शाखा नियंत्रण यांच्या पथकास मिळालेल्या बातमीनुसार पोलिस पथकाने पंचांसह घटनास्थळी छापा टाकला असता, घटनास्थळी बनावट ग्रीस बनवत असल्याचे निदर्शनास आल्याने तसेच सदर ठिकाणी वेगवेगळया ऑईलचे ड्रम व इतर पावडर मिळुन आल्याने, ग्रीस तयार करण्याच्या प्रक्रियेबाबत त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे व परवाना नसल्याचे सांगितल्याने सदरचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त गाळा व साठयाचे मालक मुकेश हिरालाल मिर्घ याने सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांना विविध आस्थापनांकडून निर्गमित करण्यात आलेला परवाना, गुमास्ता परवाना व नोंदणी प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती निवेदनासोबत सादर केल्याचे सांगुन पोलिसांनी त्याचे गोदाम सिल करुन त्याच्यावर अन्याय केला असल्याचे सांगितले.

दि लुब्रिकेटींग ऑईल्स् ॲन्ड ग्रिसेस (प्रोसेसिंग, सप्लाय ॲन्ड डिस्ट्रिब्युशन रेग्युलेशन) ऑर्डर, १९८७ चे कलम २(सी) मध्ये प्रोसेसरच्या व्याख्येमध्ये लुब्रिकेटींग ऑईल ॲन्ड ग्रिस च्या प्रोसेसिंग, मॅन्युफॅक्चरिंग, ब्लेंडींग, कंपाऊंडींग, पॅकेजींग, रिफायनींग अथवा रि-रिफायनींग किंवा विक्रीची प्रक्रिया विषद केली आहे. कलम ३ अन्वये कोणत्याही व्यक्तिस प्रोसेसिंगच्या व्यवसायाकरीता परवाना धारण करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे. तसेच सदरचा परवाना प्राप्त करुन घेण्याकरीता कलम ५(१) अन्वये नमुना १ मध्ये अर्ज करणे आवश्यक असल्याचे नमुद आहे.

तथापी, मुकेश हिरालाल मिर्घ याने सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, त्याने दिनांक २८/०२/२०११ रोजी मे. महालक्ष्मी लुब्रिकंटस् या आस्थापनेच्या नावे डी/७ मकसुद इस्टेट, किस्मत नगर, सीएसटी रोड, कुर्ला (प.) मुंबई-७० या गाळयामध्ये ब्लेंडींग ॲन्ड मिक्सींग ऑफ ऑल काईन्डस् लुब्रिकंट ऑईल ॲन्ड ग्रिस या प्रक्रियेकरीता मॅन्युफॅक्चरर् (उत्पादक) साठी मेमोरेन्डमच्या रुपात नमुना १ नुसार अर्ज क्र. ००००९१ अन्वये उद्योग सहसंचालक; (एमएमआर), चुनाभट्टी, मुंबई यांचे कार्यालयांत अर्ज सादर केल्याचे दिसुन येते. त्या अनुषंगाने उद्योग सहसंचालक या कार्यालयाकडून अर्ज क्र ००००९१ हे दिनांक २८/०२/२०११ रोजी स्विकारल्याची पोचपावती देण्यात आली असुन सदर पोच पावतीच्या पहिल्या परिच्छेदात "मे. महालक्ष्मी लुब्रिकंटस् यांना उत्पादक आस्थापना स्थापीत करावयाचे असल्याने मेमोरेंडम सादर केले आहे व सदर उत्पादनाची कार्यप्रणाली दिनांक ०१/१०/२०११ पासुन सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याबाबत मेमोरेंडम (अर्ज) मध्ये नमुद आहे". सदर पोचपावतीमधील मे. महालक्ष्मी लुब्रिकंटस् यांना सदरचा प्रस्तावित उत्पादनाचा व्यवसाय सुरु करण्यास कांही अटी व शर्तीचे पालन व संबंधित प्राधिकरणाकडून पुर्तता करुन घेणेबाबत नमुद आहे. त्यामधील अट क्र. १ मध्ये संबंधित आस्थापनाने आवश्यक निपटारा, परवाने व परमिट हे केंद्रशासन/राज्यशासन/न्यायालयीन आदेशानुसार प्राप्त करुन घेणे अनिवार्य असल्याचे नमुद आहे. अट क्र. ३(बी) नुसार उद्योग सहसंचालक यांच्या कार्यालयाकडून तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. अट क्र. ५ मध्ये सदरचे उत्पादन युनिट स्थापीत करण्यापूर्वी अर्जदाराने उद्योग सहसंचालक यांचे कार्यालयाकडून मेन्युफॅक्चरिंग एन्टरप्राईझ

(उत्पादक आस्थापना) करीता ना हरकत प्रमाणपत्र व त्यासोबत बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून संमतीपत्र तसेच प्रदुषण नियंत्रण बोर्डाकडुन ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक असल्याचे नमुद आहे.

परंतु मे. महालक्ष्मी लुब्रिकंटचे मालक यांनी सदर अर्जासोबत बृहन्मुंबई महानगरपालिका कडील नमुद पत्यावरील ग्रिस किंवा टेलो करीता तसेच ५००० लिटर सर्व प्रकारचे मिनरल ऑईल्स करीता साठवणुक परवाना क्र. ७६१०३००६२ सादर केल्याचे दिसुन येते. याव्यतिरीक्त नमुना ड मधील बृहन्मुंबई महानगरपालिका कडील गुमास्ता परवानाची अस्पष्ट व काळपट असलेली छायांकित प्रत सादर केली आहे. त्यामध्ये गुमास्ता परवानाचे निर्गमित केलेले दिनांक व विधिग्राहय असलेले दिनांक या महत्वाच्या बाबी दिसुन येत नाहीत. वरील नमुद कागदपत्रांव्यतिरीक्त मे. महालक्ष्मी लुब्रिकंटचे मालक यांनी इतर कोणतेही आवश्यक परवाने अथवा पुरावादर्शक कागदपत्रे सादर केल्याचे दिसुन येत नाही. म्हणजेच त्यांनी मोघम स्वरुपाचे निवेदन व त्यासोबत अपुर्ण कागदपत्रे सादर करुन या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभुल करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसुन येते.

तसेच रासायनिक पृथ:करण अहवालामध्ये 1) Exhibit Nos. 1 contains vegetable oil. 2) Exhibit Nos. 2 & 3 contain petroleum hydrocarbon oil having density at 30 °C is 0.881 and 0.873 and flash point 160 °C and 130 °C respectively. 3) Exhibit No. 4 & 5 contain grease. 4) Aluminum, Calcium, Magnesium, Carbonate and Silicate radicals are detected in Exhibit No. 6 असे नमूद आहे.

उपरोक्त पृथ:करण अहवालाचे अवलोकन करता नमुद गाळयामध्ये जप्त केलेल्या साठयापैकी प्रदर्शित क्र. १ मध्ये वनस्पती तेल तसेच प्रदर्शित क्र. ६ मध्ये विविध प्रकारचे रासायनिक पावडर असल्याचे नमुद आहे. दि. महाराष्ट्र शेड्युल्ड कमोडिटीज होलसेल डिलर्स लायससिंग ऑर्डर, १९९८ अन्वये खाद्यतेल/वनस्पती तेलाची खरेदी, साठवणुक व विक्रीच्या व्यवसायासाठी परवाना घेणे क्रमप्राप्त आहे. तथापी, मे. महालक्ष्मी लुब्रिकंटस् चे मालक यांनी शिधावाटप यंत्रणेकडील खाद्यतेलाचा परवाना, लुब्रिकेटींग ऑईल व ग्रिसच्या उत्पादनाकरीता आवश्यक असलेला उद्योग सहसंचालक यांच्या कार्यालयाकडील परवाना, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ या आस्थापनांकडून ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतले नाही व मुंबई अग्नीशमन दल व बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडून आवश्यक असणारे संमतीपत्र अथवा ना हरकत प्रमाणपत्रही प्राप्त करुन घेतले नसल्याचे दिसुन येते. तसेच पोलिस पथकाने छापा टाकला असता, गाळ्यामधील ३ इसम गाळ्याचे उत्तरेकडील भिंतीलगत पेटत्या शेगडीवर एक लोखंडी मोठी कडईमध्ये ऑईल व पावडरचे मिश्रण करुन बनावट ग्रीस तयार करत असल्याचे पोलिस पथकास दिसून आले. पोलिस पथकाने सदर इसमांना ते तयार करीत असलेले

पदार्थाबाबत विचारणा केली असता, त्यांनी ऑईल व केमिकल पावडर यांचे मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करीत असल्याचे कबूल केले आहे. तसेच सदर गाळ्याचे मालक याने सदर ग्रीस तयार करण्याच्या प्रक्रियेबाबतचे त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे व परवाना नसल्याचे पथकास पंचांसमक्ष सांगितले आहे. सदर गुन्हा नोंद प्रकरणी जप्त करण्यात आलेला वनस्पती तेल, लुब्रिकेटींग ऑईल व ग्रिसचा साठा हा विनापरवाना अवैधमार्गाने खरेदी करुन गैरमार्गाने मिळविलेल्या ऑईल व पावडर (रासायनिक) यांच्या मिश्रणातून बनावट ग्रीस तयार करुन बेकायदेशिर ऑईल व ग्रिसचा मिश्रीत केलेल्या साठयाची अवैध विक्री करुन त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत आहे. सबब, जप्त करण्यात आलेला संपुर्ण ऑईल, वनस्पती तेल, ग्रिस व इतर मुद्देमाल हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ६५/२०१२, दिनांक २८/०३/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात राहून पुढील आदेश देत आहे.

<u>आदेश</u> :-

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या प्रत्येकी २०० लिटर क्षमतेच्या पुर्ण भरलेल्या २३ लोखंडी ड्रममधील ४६०० लिटर ऑईल व २०० लिटर क्षमतेच्या अर्धे भरलेल्या ४ लोखंडी ड्रममधील २०० लिटर ऑईलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

२) जप्त करण्यात आलेल्या प्रत्येकी २०० किलो क्षमतेच्या पुर्ण भरलेल्या ४ लोखंडी ड्रममधील ८०० किलो काळया रंगाचे ग्रिस व २०० किलो क्षमतेच्या पुर्ण भरलेल्या २ लोखंडी ड्रममधील ४०० किलो सफेद रंगाच्या ग्रिसचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

३) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

४) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेचे ३३ लोखंडी ड्रम्स, काळया रंगाची कढई, शेगडी व इतर साहित्याची पोलीसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

CONTROLLER RATIONING & DIRECTOR HEAD OFFICE MUMBAI

५) जप्त करण्यात आलेल्या ३७ गोण्यांमधील सफेद रंगाची सोफ स्टोन पावडरचा साठा शासनजमा करण्यात येत आहे. सदर साठयाचा भेसळीसाठी पुन्हा गैरवापर होवू नये म्हणुन पोलिसांनी कायमस्वरुपी जप्त करावे.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) गाळ्याचा मालक मुकेश हिरालाल मिर्घ
२) लालजी हिरालाल जयस्वाल
३) विनोद राम बच्चन यादव
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, कुर्ला पोलिस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

0010